महाराष्ट्र शासन

महसुल विभाग

# तहसिलदार भद्रावती यांचे कार्यालय

Email.ID: tah.bhardawati@gmail.com
दुरध्वनी क्रमांक (०७१७५) २६५०८०

क्रमांक: कावि/मह.सहा/तलाठी आस्था/२०२३/359
दिनांक: २२ मे, २०२३

**संदर्भ:- मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे पत्र क्र. मशा/कार्या-२/आस्था.टे.४/२०२३/६४९ , दि. ०४ मे २०२३.**

## :-जाहीरनामा:-

सर्व नागरीकांना याव्दारे सुचित करण्यात येते कि, भद्रावती तालुक्यातील खालील तलाठी साझा करीता त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गातून कोतवाल पद भरावयाचे आहे.

| अ.क्र. | कोतवाल पद भरावयाचा साझा क्र. व नांव | कोतवाल पद भरावयाची संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | **मौजा – माजरी** | **०१** | **अनुसुचीत जाती** |
| २ | **मौजा- भामडेळी** | **०१** | **अनुसुचीत जमाती** |
| ३ | **मौजा –चिचोर्डी** | **०१** | **वि.जा (अ)** |
| ४ | **मौजा- आवंढा रै.** | **०१** | **भटक्या जमाती (क)** |
| ५ | **मौजा- विजासन** | **०१** | **भटक्या जमाती (ड)** |
| ६ | **मौजा- घोनाड** | **०१** | **इतर मागस वर्ग** |
| ७ | **मौजा- डोंगरगाव खडी** | **०१** | **इतर मागस वर्ग** |
| ८ | **मौजा- कोंढा** | **०१** | **इतर मागस वर्ग** |
| ९ | **मौजा- बिजोनी** | **०१** | **इतर मागस वर्ग** |
| १० | **मौजा- चिरादेवी** | **०१** | **आर्थिक दुर्बल घटक** |
| ११ | **मौजा- पिर्ली** | **०१** | **अराखीव** |
| १२ | **मौजा- घोडपेठ** | **०१** | **अराखीव** |

उपरोक्त प्रवर्गातील कोतवाल पदाकरिता इच्छुक स्थानिक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत येत आहे. तरी उमेदवारांनी विहीत नमुन्यात दोन पासपोर्ट साईज फोटोसहीत अर्ज आवश्यक कागदपत्र व पुराव्यासहीत दिनांक **२४ मे २०२३ ते ०७ जुन २०२३ रोजी सायंकाळी ०४.००** वाजेपर्यन्त कार्यालयीन वेळेत तहसीलदार,भद्रावती यांच्या कार्यालयात आस्थापना शाखेत सादर करावेत व त्याबाबत पोच घ्यावी. अर्जाचा नमुना तहसील कार्यालयातील आस्थापना शाखेत कार्यालयीन वेळेत व दिवशी उपलब्ध आहे. विहीत तारखे नंतर येणाऱ्या व अपुर्ण भरलेल्या अर्जाचा तसेच जाहीरनाम्याच्या पूर्वी सादर केलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

## :- कोतवाल भरती संबंधी वेळापत्रक :-

१) अर्ज स्विकारण्याची तारीख **२४ मे २०२३** ते शेवटची तारीख **०७ जुन २०२३** रोजी तहसिल कार्यालय भद्रावती येथे **सायंकाळी ४.००** वाजेपर्यंत स्विकारण्यात येईल (सुट्टीचे दिवस वगळुन)

२) पात्र उमेदवारांची यादीची प्रसिध्दी दिनांक- **१२ जुन २०२३** रोजी तहसिल कार्यालय, भद्रावती यांचे नोटीस बोर्डावर लावण्यांत येईल.

३) पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा **गुरुवार** दिनांक **१५ जुन २०२३** रोजी सकाळी **११:०० ते १२:००** वाजेपर्यंत **लोकमान्य विज्ञालय तथा कनिष्ठ महाविज्ञालय गवराळा रोड भद्रावती** येथे घेण्यात येईल. सर्व पात्र उमेदवारांनी आपले अर्जाची **पोचपावती सह** परिक्षेस उपस्थित रहाणे बंधनकारक आहे.

४) सदर परिक्षेला आपणास कुठलेही पुस्तकी साहित्य, कॅल्क्युलेटर, मोबाईल, स्मार्टवॉच इत्यादी घेऊन बसता येणार नाही.

५) उमेदवारांची निवड लेखी परीक्षा मिळालेले एकुण गुण लक्षात घेवुन गुणानुक्रमे करण्यात येईल.

## :- कोतवाल भरतीसाठी पात्रता व अटी पुढील प्रमाणे :-

१) उमेदवार ज्या साझ्यासाठी अर्ज करीत आहे. त्या साझ्यातील अंतर्भूत असणाऱ्या गावामधील रहिवासी असणे आवश्यक आहे. उमेदवाराने स्थानिक जागेचा रहिवाशी असल्याबाबतचे (घर टॅक्स पावती/रेशनकार्ड/निवडणूक ओळखपत्र/मनरेगा अंतर्गत जॉब कार्ड/आधार कार्ड) यापैकी एखादा पुरावा जोडणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही.

२) उमेदवाराचे वय जाहीरनाम्याच्या दिनांकाला कमीत कमी **१८ वर्ष** व जास्तीत जास्त **४० वर्ष** या दरम्यान असावे. (पुराव्या दाखल जन्म तारखेचा दाखला / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / पॅन कार्ड /ड्रायव्हींग लायसन्स, यापैकी एखादा पुरावा जोडणे आवश्यक आहे.) या व्यतिरिक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही.

३) उमेदवारांनी फक्त काळया शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरु नये.

४) उमेदवारांची शैक्षणिक पात्रता इयता ४ थी पास असणे आवश्यक आहे.

५) उमेदवार शारिरिक दृष्टया सक्षम असावा, नियुक्ती नंतर जिल्हा मेडिकल बोर्डाचे /चिकीत्सक प्रमाणपत्र १ (एक) महिन्यात उमेदवाराला सादर करावे लागेल. त्याची जबाबदारी उमेदवाराची असेल. सदर प्रमाणपत्र १ (एक) महिन्यात प्रमाणपत्र सादर न केल्यास सदरची निवड रद्द करण्यांत येईल.

६) उमेदवाराने चारित्र्याबाबत सबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचे प्रमाणपत्र नियुक्ती नंतर सादर करावे. सदर प्रमाणपत्र १ (एक) महिन्यात प्रमाणत्र सादर न केल्यास सदरची निवड रद्द करण्यांत येईल.

७) उमेदवाराने ज्या प्रवर्गासाठी अर्ज केला आहे त्या संवर्गाचे सक्षम अधिकाऱ्याचे जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. **जातीचे प्रमाणपत्र न जोडल्यास अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. तसेच उमेदवाराला नियुक्ती झाल्यास नियुक्ती दिनांकापासुन सहा महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. विहीत कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास पुर्व सुचना न देता कोणतेही कारण न देता कोणत्याही वेळी नियुक्ती रदद (समाप्त) करण्यात येईल.**

८) अर्जासोबत कुठल्याही **राजकीय पक्षाची शिफारस** जोडलेली नसावी. अन्यथा आपला अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. तसेच निवड प्रक्रिये दरम्यान कुठलाही दबाव आणल्यास आपली निवड रद्द करण्यांत येईल.

९) अर्ज हा अर्जदारानेच वैयक्तिक स्वत: हजर राहून सादर करावा. अर्ज पोस्टाव्दारे पाठविण्यात येवु नये.

१०) अपुर्ण माहीतीचे अर्ज रद्द करण्यात येईल. त्याबाबत कोणतेही पत्र व्यवहार करण्यात येणार नाही.

११) अर्जामधील महिती खोटी आढळल्यास अर्ज रद्य करण्यात येईल. किंवा नियुक्ती झाल्यानंतर ती रद्द करण्यात येईल.

१२) कोतवाल हे पद अवर्गीकृत पद असुन शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयानुसार मानधन देय राहील.

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

१३) कोतवाल पदासाठी होणारी परीक्षा ही वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नांची राहील.

१४) विहीत नमुन्यातील अर्ज तहसील कार्यालय, भद्रावती येथे **रुपये ५०/-शुल्क** भरुन उपलब्ध होईल. (विहीत नमुन्यातील अर्जच स्विकारण्यात येतील)

१५) साज्या बाहेरील अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१६) ज्या अर्जदाराचे अर्ज पात्र ठरतील त्याच उमेदवाराची **१००** गुणाची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

प्रकिया शुल्क:- उमेदवारांनी खालीलप्रमाणे प्रक्रिया शुल्क भरणे आवश्यक आहे.

| **प्रवर्ग** | **खुला प्रवर्गातील उमेदवारांसाठी** | **मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी** |
|---|---|---|
| **परिक्षा शुल्क** | **रु ५००/- (रु. पाचशे मात्र /-)** | **रु. ३००/- (रु.तिनशे मात्र/-)** |

१७) कागदपत्रे पडताळणीसाठी मुळ प्रमाणपत्रे आणणे आवश्यक आहे.

१८) जाहिरातीमध्ये किंवा जाहिरातीच्या काही भागांमध्ये अंशत: बदल किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे मा. तहसिलदार भद्रावती यांचे कडे राखून ठेवत आहे.

१९) अर्जदाराला निवड प्रक्रियेसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

वरिल सर्व अटी व शर्तींना अनुसरुन तहसीलदार, भद्रावती नियुक्ती अधिकारी व जिल्हाधिकारी, चंद्रपुर यांचा निर्णय अंतिम राहिल.

**दिनांक - २२ मे २०२३**

तहसिलदार भद्रावती

**(अनिकेत सोनवणे)**
**तहसीलदार भद्रावती**

प्रतिलीपी :- **माहिती करीता सविनय सादर.**

१) मा. जिल्हाधिकारी, चंद्रपुर
२) मा. उप विभागीय अधिकारी, वरोरा

**माहिती तथा नमुद दिलेल्या कार्यवाहीस्तव अग्रेषीत.**

१) **जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी जि. का. चंद्रपुर यांनी NIC वर सदर जाहिरनाम्याची एक प्रत प्रसिध्द करावी.**

२) गट विकास अधिकारी पंचायत समिती, भद्रावती यांनी नोटीस बोर्डावार लावुन प्रसिध्द करावी व प्रसिध्दी प्रतिवेदन या कार्यालयास सादर करावे.

३) तलाठी साझा. क्रमांक.-**माजरी /भामडेळी /चिचोर्डी /आवंडा /विजासन /घोनाड /डोंगरगाव खडी /कोंढा/ बिजोणी/ चिरादेवी /पिर्ली /घोडपेठ** यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावून व साझ्यातील सर्व गावांत तशी प्रसिध्दी / मुनादी देवून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

४) सचिव ग्रामं पचायत **माजरी/भामडेळी/चिचोर्डी/आवंडा/चालबर्डी/घोनाड/डोंगरगाव(खडी) /कोंढा/बिजोणी/चिरादेवी/पिर्ली/घोडपेठ/गोरजा/देऊरवाडा/सेलोटी.वाघेडा/कान्सा/जेना/टेकाळी/ कोंडेगाव/चेकतिरवंजा/तिरवंजा.मो./केसुर्ली/पिपरी/मुरसा/धानोली/भटाळी/कोची** यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

५) प्रेषक शाखा, तहसील कार्यालय, भद्रावती यांना आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयातील सुचना फलकावर लावून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

**(अनिकेत सोनवणे)**
**तहसीलदार भद्रावती**

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner